## निशाणी ४९ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क.१ याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये त्याच्या लेखी बयाणात आनुषंगीक दुरूस्ती होउन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. दावा प्रलंबीत असतांना वादीने दि. १४.०९.२०२३ रोजी दाव्यामध्ये दुरुरूती करुन त्याप्रमाणे वादपत्राची दुरुस्त प्रत दाखल केलेली होती. त्यानंतर दिनांक ०४.१०.२०२३ रोजी प्रतिवादी क.१ ने नि.४८ अन्वये त्याला त्याचे लेखी जबाबामध्ये आनुषांगीक दुरूस्ती करण्याबाबत अर्ज सादर केला होता. दिनांक २३.१०.२०२३ रोजी माझे विद्वान पुर्वपिठासीन अधिकारी यांनी प्रस्तूत अर्जावर आदेश करून प्रतिवादी क.१ ला त्याचे लेखी जबाबात आनुषंगीक दुरूस्ती करण्याची परवानगी दिली. परंतू, प्रतिवादी क.१ याने नजरचूकीने प्रस्तूत आदेशाप्रमाणे त्याच्या लेखी जबाबामध्ये मुदतीत आनुषंगीक दुरूस्ती करू शकला नाही. परिणामी प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क.१ याने दाखल केला आहे. प्रस्तूत दाव्यात वादीने वादपत्राच्या परीच्छेद क. १-अ व ४-अ मध्ये नव्याने मजकूर समाविष्ठ केलेला आहे. सदर मजकूराच्या अनुषंगाने प्रतिवादी क.१ ला त्याच्या म्हणण्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रतिवादीच्या म्हणणे प्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती झाल्यास त्यांच्या म्हणण्याच्या मुळ स्वरुपात काही एक बदल होत नाही. सबब प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन सक्त विरोध दर्शविलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे सदर अर्ज कायदेशीर तरतुदी प्रमाणे बरोबर नाही. तथापी, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची

विनंती केलेली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांनी त्यांचे अनुक्रमे दावा व लेखी म्हणण्यामध्ये केलेल्या विरुध्द कथनांवरुन प्रस्तुतचा अर्ज गुणदोषावर निकाली करण्याकरिता खालील प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यांचा निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेसह देत आहे.

| **प्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. प्रस्तुतचा अर्जातील नमूद दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्या दरम्यानचा दावा कायमस्वरुपी गुणदोषावर निकाली करण्याकरिता आवश्यक आहे काय ? | **होकारार्थी.** |
| २. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झाल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होईल काय ? | **नकारार्थी.** |
| ३. आदेश ? | **अंतिम आदेशानुसार.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

५. मी वादी व प्रतिवादी क.१ यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>प्रश्न क. १ व २ बाबत</u> :-**

६. प्रस्तुत दाव्यामधील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, दावा प्रलंबित असताना वादीने नि.क.४७ च्या आदेशाप्रमाणे दावा दुरुस्त करुन दावा मिळकतीच्या वाटपा बाबतचा मजकूर नव्याने दाव्यामध्ये समाविष्ट केलेला आहे.

७. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील म्हणण्याप्रमाणे त्यांना वादीने दाव्यामध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या मजकुरांबाबत त्यांचे स्पष्टीकरण देणे आवश्यक असल्याने त्यांनी त्यांचे म्हणणे दुरुस्त करण्याची परवानगी मागीतलेली आहे. वादीने केलेल्या दाव्यातील दुरुस्तीच्या अनुषंगाने विचार

करता प्रतिवादींच्या अर्जातील कथन व दाव्याचे स्वरुप बघता दोन्ही पक्षकारांमधील वादाचे पूर्णपणे निराकरण होण्यासाठी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रस्तावित केलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादींच्या अर्जाचे अवलोकन करता, अर्जामध्ये नमुद केलेली प्रस्तावीत दुरूस्ती ही प्रतिवादीच्या मुळ कथनाशी विसंगत नसल्याचे दिसून येते.

८. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन करता दाव्यामध्ये अद्यापपावेतो साक्षीपुरावा नोंदविण्याचे कामकाज सुरु झालेले नाही. त्यामुळे दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची व साक्षीदारांची उलटतपासणी करण्याची पूर्ण संधी उपलब्ध आहे. त्यामुळे प्रस्तुत म्हणणे दुरूस्तीचा अर्ज मंजूर केल्यास त्याचा वादीच्या हक्कावर विपरीत परिणाम होत नाही. म्हणून प्रस्तुत अर्ज दाव्याचे पुर्णपणे निराकरण होण्यासाठी मंजुर करणे आवश्यक आहे. सबब, मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत असून प्रश्न क.२ चे उत्तर नकारार्थी देत आहे. प्रश्न क्र.३ च्या अनषंगाने खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादीचा नि.क.४९ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादीनी अर्जाप्रमाणे लेखी उत्तरात १४ दिवसांचे आत लेखी बयाणात आनुषंगीक दुरूस्ती केलेली प्रत दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

PRASHANT PRABHAKAR KULKARNI

Digitally signed by PRASHANT PRABHAKAR KULKARNI
Date: 2024.07.05 11:27:36 +0530

**( प्रशांत प्र. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर
चंद्रपूर.

दि. ०३.०७.२०२४.